# KIRAN TUTORIALS

Seat No.

**Std 10 (English)** **Marathi** **Date 01-10-20**

| Time 1HRS | Chapter 1.00,11,21,22,23 | Marks 25 |
|---|---|---|

**Q.1** **पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा :** **7**

**1** **A1)** i) सहसंबंध लिहा. 1

i. आई : मूल :: वाघिण : ..............
ii. पाय : पाऊलखुणा :: पानगळं : ..............

**Ans**
i. आई : मूल :: वाघिण : **पिल्लं**
ii. पाय : पाऊलखुणा :: पानगळं : **पाचोळा**

ii) रिकामी जागा भरा. 1

i. प्रचंड .............. दिवस असल्यानं वाघासारखं जनावर पाण्याचा आसपास वावरतं.
ii. लहान पिल्लं असणारी .............. ही जंगलातलं सगळयात धोकादायक जनावर!

**Ans**
i. प्रचंड **उष्णतेचे** दिवस असल्यानं वाघासारखं जनावर पाण्याचा आसपास वावरतं.
ii. लहान पिल्लं असणारी **वाघीण** ही जंगलातलं सगळयात धोकादायक जनावर!

कालच संध्याकाळी विश्राम गृहावर गप्पा मारताना टोंगेंनी मला त्या परिसरात चार पिल्लं असलेल्या वाघिणीबद्दल सांगितलं होतं. तेव्हा पासूनच मला कधी तिथं जातो असं झालं होतं. प्रचंड उष्णतेचे दिवस असल्यानं वाघासारखं जनावर पाण्याच्या आसपासच वावरतं. तशातच लहान पिल्लं असल्यानं या वाघिणीला त्यांना पाण्यापासून जास्त दूर नेणंदेखील शक्य नव्हतं; पण लहान पिल्लं असणारी वाघीण ही जंगलातलं सगव्यात धोकादायक जनावर! पिल्लांच्या संरक्षणासाठी ही सजग आई, कुणाचा जीवदेखील घ्यायला मागं-पुढं बघत नाही.त्यामुळं सुकलेल्या नाल्यात उतरताना माझ्या मनावर एक अनामिक दडपण आलं होतं.

वाघीणअद्याप आपल्या पिल्लांसह याच परिसरात वावरत होती. आता मी ती पिल्लं बघायला चांगलाच अधीर झालो होतो. इथून सुमारे शंभर-सव्वाशे पावलांवर नाल्यात थोडंसं पाणी असल्याचं मला माहीतच होतं. ही वाघीण तिथंच सापडण्याची शक्यता होती. त्यामुळं आता तिकडं जाताना खूपच सावधगिरी बाळगणं आवश्यक होतं. जमिनीवर सर्वत्र पानगळीमुळं पडलेला वाळका पाचोळा साचून होता. त्या वरून पाय न वाजवता जाणं ही एक मोठीच कसरत होती.

पाणवठा जसा जवळ आला तसं माझं हृदय जोरजोरात धडधडू लागलं. पुढं काय दिसेल, या जाणिवेनंच माझा घसा कोरडा पडला. इतरांचीही अवस्था काही वेगळी नव्हती. आम्ही सगव्यांनीच एकमेकांकडं बघत चौकस राहण्याची डोव्यांनीच खूण करून सूचना केली. आता एकेक पाऊल टाकताना मनावरचं दडपण अधिकच वाढत होतं. कुठंतरी झाडाच्या बुंध्या आड, जांभळीच्या झुडपात लपलेली वाघीण रागानं गुरगुरत क्षणार्धात अंगावर येणार, असंच वाटत होतं. वाऱ्यानं हळूच होणारी पानांची सळसळदेखील मोठी वाटत होती. आता जणू सगळा काळच थांबला असावा असं वाटत होतं.

**Ans**

**A2)** विधान पूर्ण करा. 2

1) प्रचंड उष्णतेचे दिवस असल्यानं वाघासारखं जनावर .............. .

**Ans** प्रचंड उष्णतेचे दिवस असल्यानं वाघासारखं जनावर **पाण्याचा आसपास वावरतं.**

2) पिल्लांच्या संरक्षणासाठी ही सजग आई, ..............

**Ans** पिल्लांच्या संरक्षणासाठी ही सजग आई, **कुणाचा जीवदेखील घ्यायला मागं-पुढं बघत नाही.**

**A3)** स्वमत 3

'वाऱ्यानं हळूच होणारी पानांची सळसळदेखील मोठी वाटत होती' या विधानाचे लेखकाच्या मनावर दडपण का आले होते?

**Ans** लेखक वाघिणी व तिच्या पिल्लांना पाहण्यास अधीर झाला होता. त्यातच प्रचंड उष्णतेचे दिवस असल्याने वाघासारखं जनावर पाण्याचा आसपासं वावरतं हे लेखकास माहित होते. त्यात पिल्लं लहान असल्यानं वाघिणीला त्यांना पाण्यापासून जास्त दूर नेणंदेखील शक्य नव्हतं; त्यात लहान पिल्लं असणारी वाघीण हे जंगलातलं सगळयात धोकादायक जनावंर! पिल्लांच्या संरक्षणासाठी ही सजग आई, कुणाचा जीवदेखील घ्यायला मागं-पुढं बघत नाही. त्यातच सर्वत्र सुके नाळे झाले होते. जमिनीवर ही सर्वत्र पानगळीमुळे पडलेला वाळका पाचोळा साचून होता. पाय न वाजवता जाणं ही मोठी कसरत होती. झाडाच्या बुंध्याआड, जांभळीच्या झुडपात बसलेली वाघीण गुरगुरत अंगावर येणारं असंच वाटत होतं. त्यावेळी वाऱ्यानं हळूच होणारी पानांची सळसळदेखील लेखकास मोठी वाटत होती वं त्यामुळे लेखकाच्या मनावर दडपण आले होते.

**Q.2** **पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.** 8

1 **A1)** i) कवितेच्या आधारे खालील कृती केव्हा घडतात ते लिहा 1

i. गाय हंबरत धावते - ______
ii. हरीण चितींत होते - ______

**Ans**
i. गाय हंबरत धावते. - **भुकेल्या वासरां च्या दिशेने आवाज येतो.**
ii. हरीण चितींत होते - **अरण्याला वणवा लागतो.**

ii) कोण ते लिहा. 1

i. परमेश्वराचे दास - ______
ii. मेघाला विनवणी करणारा - ______

**Ans**
i. परमेश्वराचे दास - **संत नामदेव.**
ii. मेघाला विनवणी करणारा - **चातक पक्षी.**

अग्निमाजि पडे बाळू । माता धांवें कनवाळू ।।१।।
तैसा धांवे माझिया काजा । अंकिला मी दास तुझा ।।२।।
सवेंचि झेंपावें पक्षिणी। पिलीं पडतांचि धरणीं ।।३।।
भुकेलें वत्सरावें । धेनु हुंबरत धांवे ।।४।।
वणवा लागलासे वनीं। पाडस चिंतीत हरणी।।५।।
नामा म्हणे मेघा जैसा । विनवितो चातक तैसा ।।६।।

**Ans**

**A2)** i) एका शब्दात उत्तरे लिहा. 1

i. चिंता करणारी - ______
ii. कनवाळू धावणारी - ______

**Ans**
i. चिंता करणारी - **हरीण**
ii. कनवाळू धावणारी - **आई**

ii) सहसंबंध लिहा. 1

i. आई : बाळ :: पक्षीण : ______
ii. मेघ : चातक :: हरीण : ______

**Ans**
i. आई : बाळ :: पक्षीण : **पिल्लू**
ii. मेघ : चातक :: हरीण : **पाडस**

**A3)** प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा. 2

i. धेनु -
ii. हुंबरत -

iii. वणवा -
iv. वनीं -

**Ans** i. धेनु - **गाय**
ii. हुंबरत - **हंबरणे**
iii. वणवा - **आग**
iv. वनीं - **अरण्य / जंगल**

**A4)** स्वमत 2

संत नामदेवांनी ‘आईकडून व्यक्त केलेल्या अपेक्षा अभंगाच्या आधारे लिहा.

**Ans** संत नामदेवांनी आईकडे अशी अपेक्षा केली आहे, की प्रत्येक वेळी संकटात वाचविण्यासाठी आई कोठेही असेल तरी आपल्या बाळासाठी धावत यावी. तिचे बाळ तिच्यावर अवलंबून असते. बाळ येणाऱ्या अडचणींना तोंड देण्यास असमर्थ आहे. म्हणून त्याला त्याच्या आईची नितांत गरज आहे. मानव पशु-पक्षी प्रत्येकाला आईची आवश्यकता असते.

**Q.3** **पुढीलपैकी कृती सोडवा : (स्थूलवाचन)** **3**

**1** मेटलायझिंग प्रक्रियेवर काम न होण्यामागची कारणे कोणती असावीत असे तुम्हांला वाटते?

**Ans** मेटलायझिंग प्रक्रियेवर काम न होण्याची कारणे म्हणजे स्वतःहून कोणीही या कामाकडे लक्ष दिले नाही. यंत्रसामग्री होती, पण काम करणा-या इंजिनियरना मदतीसाठी सहकारी हवे होते. काम सुरू होण्याआधीच लोक खूप प्रकारच्या मागण्या करत. अशा या वृत्तीमुळे आतापर्यंत मेटलायझिंग प्रक्रियेवर काम झाले नव्हते.

**Q.4** **कंसातील सूचनेनुसार वाक्यरुपांतर करा.उद्गारार्थी / आज्ञार्थी ...** **1**

**1** सकाळच्या टवटवीत आणि प्रसन्न वातावरणात अभ्यास खूप छान होतो. (उद्गारार्थी करा)

**Ans** अहाहा! किती छान अभ्यास होतो सकाळच्या टवटवीत आणि प्रसन्न वातावरणात!

**Q.5** **पुढील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** **1**

**1** i. उद्धार - ...............
ii. जीभ - ..............

**Ans** i. उद्धार - **विकास**
ii. जीभ - **जिव्हा**

**Q.6** **पत्रलेखन** **5**

**1** खालील निवेदन वाचा व त्याखालील कोणतीही एक कृती सोडवा.

खुशखबर!

दिनांक- १४ नोव्हेंबर

**खुशखबर!**

विद्या विनयेन शोभते

रसिक प्रकाशन, रत्नागिरी तर्फे

उत्कृष्ट बालसाहित्य पुरस्कार प्रदान सोहळा

**पुरस्कारार्थी** - डॉ. विजया वाड - नामवंत लेखिका

खुशखबर!

दुपारी- ४ वाजता

**टीपः** कार्यक्रमस्थळी सकाळी १०.०० ते रात्री ८.०० पर्यंत सवलतीच्या दरात पुस्तक विक्री.

**स्थळः** रसिक प्रकाशन कार्यालय मंगळवार पेठ, रत्नागिरी

अमित/अमिता जगदाळे, प्रगती विद्यालय, रत्नागिरी

विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने पत्र लिहित आहे.

प्रकाशकांकडे पुस्तकांची मागणी करणारे पत्र लिहा.

किंवा

नामवंत लेखिका डॉ. निलम गांधी यांच्या बालसाहित्याला पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

**Ans** .